महाराष्ट्र शासन

क्रमांक : घबाअ-२०११/(१०)/(प्र.क्र.८/११)/पाच,
विधी व न्याय विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २८ मार्च, २०११.

प्रति

अपर प्रबंधक,
उच्च न्यायालय (अ.शा./मू.शा.),
मुंबई.

विषय :- घरबांधणी अग्रिम धन प्रमाणित करणेबाबत सन २०१०-२०११.

महोदय,

उपरोक्त विषयांसंदर्भात आदेशावरुन, मा.मुख्य न्यायमूर्तींच्या माहितीकरिता, आपणांस असे कळविण्यात येते की, सोबतच्या विवरणपत्रात दर्शविलेल्या **२१** अर्जदारांची माहिती, अग्रीम प्रमाणित करण्यासाठी छाननीनंतर योग्य आढळून आलेली आहे. त्यांना सोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे मुंबई वित्तीय नियम, १९५९ व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणा व फेरबदल व त्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रके इत्यादिंच्या अधिन राहून २०१०-२०११ या वित्तीय वर्षाकरिता उपलब्ध असलेल्या अनुदानातून, प्रमुख/मंजुरी अधिकारी यांनी केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने, घरबांधणी अग्रीम **एकूण रुपये ४१,४९,७०३/- (एकूण रुपये एक्केचाळीस लाख एकोणपन्नास हजार सातशे तीन फक्त)** प्रमाणित करण्यात येत आहे.

अ. क्र.	यादी क्रमांक	अर्जदारांची संख्या	प्रमाणित रक्कम रुपये
१	यादी क्रमांक १ :- सर्व साधारण- (वर्ग-३ व त्यावरील अधिकारी व कर्मचारी)	१०	२१०९८२०
२	यादी क्रमांक २ :- मागासवर्गीय - (वर्ग-३ व त्यावरील अधिकारी व कर्मचारी)	७	१३४५००८
३	यादी क्रमांक ३ :- सर्व साधारण - (वर्ग ४ चे कर्मचारी)	३	६०४८७५
	यादी क्रमांक ४ :- मागासवर्गीय - (वर्ग ४ चे कर्मचारी)	१	९००००
	एकूण	**२१**	**४१४९७०३**

(एकूण रुपये एक्केचाळीस लाख एकोणपन्नास हजार सातशे तीन फक्त)

२. मुंबई वित्तीय नियम, १९५९ अंतर्गत परिशिष्ट २६ मध्ये विहित केलेल्या अटींच्या अधिन राहून प्रमाणित अग्रीमास मंजुरी देण्यापूर्वी अर्जदारांकडून तो निवृत्त होण्यापूर्वी संपूर्ण अग्रीमाची व्याजासह वसुली होईल व प्रकरणपरत्वे अर्जदाराने सर्व बाबींची / कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे व ते स्थायी असल्याची पूर्ण खात्री करुन घेतल्यावरच या अग्रीमास मंजुरी देण्यात यावी. **अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर**

अनुदान उपलब्ध असेपर्यंत या अग्रीम धनास मंजुरी देऊन अग्रीमाची रक्कम कोषागारातून काढण्यात यावी. तसेच कोषागारातून रक्कम काढल्यानंतर ती रक्कम तीन दिवसाच्या आत संबंधित अर्जदाराला देण्यात यावी.

३. हा खर्च (मागणी क्रमांक जे-५) ७६१०-शासकीय कर्मचारी इत्यादिना कर्जे (योजनेतर/दत्तमत) २०१(००)(०१)-घरबांधणीसाठी अग्रीम (लेखाशीर्ष संकेतांक ७६१० ०४७ २) खाली खर्ची टाकण्यात यावा व २०१०-२०११ या वित्तीय वर्षाकरिता मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. **जमीन खरेदी करुन घर बांधणे** या प्रयोजनासाठी अग्रीमाचा पहिला हप्ता मंजूर केल्यानंतर दुसरा हप्ता मंजूर करण्याची शिफारस करण्यापूर्वी अर्जदाराच्या घराचे मंजूर आराखडे स्थानिक प्राधिकरणाच्या मंजुरी आदेशाची प्रत व मुंबई वित्तीय नियम, १९५९ अंतर्गत परिशिष्ट २६ मधील प्रपत्र बी-१ मध्ये अर्जदाराने भरुन दिलेल्या गहाण खताची प्रत शासनास पाठविण्यात यावी.

५. **घरबांधणी** प्रयोजनार्थ अग्रीम घेतले आहे अशा प्रकरणी अर्जदाराने बांधकाम विहित टप्प्यापर्यन्त पूर्ण केले आहे याची खातरजमा करावी व तसा अहवाल व त्या टप्प्यापर्यन्त करण्यात आलेल्या खर्चाच्या पावत्या शासनाकडे सादर कराव्यात. ज्या अर्जदाराना ३ रा व ४ था हप्ता / अंतिम हप्ता म्हणून प्रमाणित करण्यात आला आहे त्या अर्जदारांकडून नियमानुसार आवश्यक त्या संपूर्ण कागदपत्रांची पूर्तता करुन घेऊन नंतरच प्रत्यक्ष रक्कम प्रदान करावी.

६. **घरबांधणी** या प्रयोजनासाठी या पत्रानुसार प्रमाणित करण्यात आलेल्या अग्रीम धनास प्रत्यक्ष मंजुरी देण्यापूर्वी अर्जदाराने मुंबई वित्तीय नियम, १९५९ अंतर्गत परिशिष्ट २६ मधील प्रपत्र बी-२ मध्ये अर्जदाराने भरुन दिलेल्या गहाण खताची प्रत शासनास पाठविण्यात यावी.

७. **तयार घर खरेदी** या प्रयोजनासाठी अग्रीम प्रमाणित करण्यात आलेल्या अर्जदारांकडून मुंबई वित्तीय नियम, १९५९ अंतर्गत परिशिष्ट २६ मधील प्रपत्र ए-२ मध्ये करारनाम्याची प्रत अर्जदाराने भरुन घेण्यात आल्यावरच अग्रीमाची रक्कम प्रत्यक्षात अदा करण्यात यावी.

८. **घरखरेदीसाठी/घरबांधणीसाठी वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड** या प्रयोजनासाठी अग्रीम प्रमाणित करण्यात आले आहे अशा अर्जदारांकडून अग्रीम मंजुरी पूर्वी त्यांच्या कर्ज शिलकीबाबतचे संबंधित वित्तीय संस्थेने दिलेले अलिकडील प्रमाणपत्र घेऊन प्रत्यक्ष उर्वरित कर्जाइतकेच अग्रीम मंजूर करावे.

९. ज्या अर्जदारांना हप्त्याने अग्रीम प्रमाणित करण्यात आले आहे अशा अर्जदारांकडून त्यांना मिळालेल्या अग्रीमाची वसुली, त्यावरील व्याजाची वसुली मुंबई वित्तीय नियम, १९५९ अंतर्गत परिशिष्ट २६ मधील तरतूदीनुसार प्रकरणपरत्वे करण्यात यावी.

१०. आपणांस असेही कळविण्यात येते की, सदर घरबांधणी अग्रीम मंजुरी आदेश काढतांना सदर सदनिकेचा वा घराचा विमा शासकीय विमा निधीकडेच उतरवावा अशी अट मंजुरी आदेशात घालावी व त्याचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी. तसेच सदर मंजुरी आदेशाची प्रत विमा संचालक

महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण भवन, म्हाडा, २६४, पहिला मजला, वांद्रे (पूर्व) मुंबई-४०० ०५१ यांनाही माहितीसाठी अग्रेषित करावी.

११. हे अग्रीमधन मंजूर केलेल्या आपल्या कार्यालयाच्या आदेशाची प्रत शासनास पाठविण्यात यावी. प्रत्यक्ष कोषगारातून रक्कम काढल्याचा दिनांक व प्रमाणक क्रमांकही त्वरीत कळविण्यांत यावा. तसेच प्रमाणित केलेल्या रकमेचा विनियोग विहित कालावधीत न झाल्यास प्रमाणित रक्कम **त्वरित** शासनास प्रत्यार्पित करण्यात यावी. सदर रकमेचा विनियोग झाला किंवा कसे याबाबत या शासन पत्राच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत शासनास कळविण्यात यावे.

१२. आपणांस असेही कळविण्यात येते की, तयार घर खरेदी (जुने अथवा नवे) या प्रयोजनासाठी अर्जदारास शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक ३ घबाअ १०८७/(४६५)/विनियम, दिनांक ६.११.१९९० मधील विशिष्ट अटींच्या अधीन राहून व त्यामध्ये नमूद केलेली सक्षम अधिका-याने दिलेली कागदपत्रे सादर केलेली आहेत याची खात्री झाल्यावरच अग्रीम मंजूर करण्यात यावा.

१३. अर्जदारास ज्या प्रयोजनासाठी अग्रीम मंजूर करण्यात आले आहे त्याच प्रयोजनासाठी त्या रकमेचा अर्जदाराकडून विनियोग करण्यात आला याबद्दलचे विनियोग प्रमाणपत्र मंजुरी अधिका-याने शासनास पाठवावे.

१४. यादी क्रमांक २ व ४ मधील अर्जदार मागासवर्गीय असल्याची सेवापुस्तक किंवा जातीच्या दाखल्याच्या आधारे खात्री करुन घेतल्यानंतरच घरबांधणी मंजुरीचे आदेश काढावेत. सदर बाब १५ दिवसात पूर्ण न झाल्यास प्रमाणित रक्कम शासनास परत करण्यात यावी. जेणेकरुन सदर रक्कम इतर पात्र अर्जदारास प्रमाणित करणे शक्य होईल. जर काही कारणास्तव अग्रीम मंजूर करण्यात येत नसेल तर तसे शासनास त्वरीत कळविण्यांत यावे. तसे न झाल्यास यावरुन उद्‌भवणा-या अनियमिततेस सदर मंजुरी अधिकारी जबाबदार राहील याची कृपया नोंद घ्यावी.

१५. संबंधित अधिकारी आपल्या कार्यालयातून बदलून दुसरीकडे गेलेला असल्यास, **अर्थसंकल्पिय वित्तीय प्रणालीवर Athorisation Slip काढण्यापूर्वी,** त्याबाबतचा तपशील शासनास कळविण्यात यावा. तदनंतर देयक तयार करण्याबाबतची पुढील कार्यवाही संबंधित कार्यालयाने करावी.

१६. जर काही कारणास्तव अग्रीम मंजूर करण्यात येत नसेल तर तसे शासनास त्वरीत कळविण्यात यावे. तसेच प्रमाणित अग्रीमापेक्षा कमी रक्कम मंजूर करण्यात येत असेल तर तसेही समुचित तपशीलासह कळविण्यात यावे व प्रमाणित अग्रीमाची उर्वरित रक्कम या विभागास तात्काळ परत करण्यात यावी.

१७. घरबांधणी अग्रीमाच्या मुद्दलाची परतफेड 'घरबांधणी अग्रीम -७६१०-शासकीय कर्मचारी इत्यादिना कर्जे-२०१-घरबांधणीसाठी आगाऊ रकमा (७६१०-५०१-५००)' या जमा शीर्षाखाली आणि व्याज '००४९-व्याज जमा-८००-इतर जमा (संकेतांक ००४९ ००६ १००) शासकीय कर्मचा-यांना दिलेल्या कर्जावरील व्याज ४५ (१) घरबांधणी अग्रीम' या जमाशीर्षाखाली जमा करण्यात यावे.

१८. या शासन पत्रान्वये प्रमाणित करण्यात आलेल्या अग्रीमावर वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या दरानुसार व्याजाची आकारणी करण्यात यावी.

१९. सोबतच्या यादीतील अर्जदारानी प्रमाणित केलेले घरबांधणी अग्रीम हे संबंधित अर्जदाराच्या कार्यालय प्रमुख/मंजुरी अधिकारी यांनी केलेल्या शिफारशीवरुन प्रमाणित करण्यात येत आहे. तेव्हा नियमांच्या अधीन राहून अग्रीमाचे वितरण करणे व त्याची वसुली करणे याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित कार्यालय प्रमुख / मंजुरी अधिकारी यांची राहील.

२०. सदरहू पत्र हे निधी उपलब्धता प्रमाणपत्र समजण्यात यावे.

आपला,

(बा.कि.रासकर)
शासनाचे अवर सचिव

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित-

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई (२ प्रती)
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर (२ प्रती)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
प्रबंधक, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई,
मुख्य न्यायदंडाधिकारी, मुंबई,
जिल्हा व सत्र न्यायाधीश, यवतमाळ, पुणे, सोलापूर, लातूर, जळगाव, अहमदनगर, गडचिरोली, नागपूर,
जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ, पुणे, सोलापूर, लातूर, जळगाव, अहमदनगर, गडचिरोली, नागपूर,
विधी व न्याय विभाग (कार्यासन २३ व २४),
निवड नस्ती.

शासन पत्र क्रमांक : घबांअ-२०११(१०)/(प्र.क्र. ८/११)/पाच, दिनांक २८ मार्च,२०११

सोबतचे विवरणपत्र - यादी क्रमांक १

सर्वसाधारण/अमागास (वर्ग ३ व त्यावरील अधिकारी व कर्मचारी)

अ.क्र.	अर्जदाराचे नाव व पदनाम	मंजुरी अधिकारी	प्रयोजन	एकूण प्रमाणित अग्रिम	या शासन पत्रान्वये प्रमाणित करण्यात आलेले अग्रीम	हप्ता/ एक रकमी	शेरा
१	श्री.एस.एस. गव्हाणे, कनिष्ठ लिपिक	जि.व स.न्या. यवतमाळ	नवीन घर बांधणी	२७३७०० (तीन हप्ते)	८२११०	३रा हप्ता (३० %)	नियमानुसार
२	श्री.एस.एम. बुटले, वरिष्ठ लिपिक	जि.व स.न्या. यवतमाळ	कर्ज परतफेड	३७५०००	३७५०००	एक रकमी	मूळ वेतनानुसार
३	श्री.व्ही.के. कदम, अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी	जि.व स.न्या. पुणे	नवीन घर बांधणी	७५०००० (तीन हप्ते)	३०००००	२रा हप्ता (४०%)	नियमानुसार
४	श्री.यू.आर.कुलकर्णी, कनिष्ठ लिपिक	जि.व स.न्या. सोलापूर	कर्ज परतफेड	१७८४४४	१७८४४४	एक रकमी	शिफारशीनुसार
५	श्रीमती इशरत आरिफ शेख नजीर, सह दिवाणी न्यायाधीश	जि.व स.न्या. जळगाव	कर्ज परतफेड	६४११७६	६४११७६	एक रकमी	शिफारशीनुसार
६	श्री.पी.एम. चिद्रे, कनिष्ठ लिपिक	जि.व स.न्या. लातूर	कालांतराने घर बांधण्यासाठी जमिन खरेदी	१८००००	१८००००	एक रकमी	नियमानुसार
७	श्री.आर.बी. फिरोदे, वाहन चालक	जि.व स.न्या. अहमदनगर	जमीन खरेदी करुन घर बांधणी	३१५००० (चार हप्ते)	७८७५०	१ला हप्ता (२५%)	नियमानुसार
८	श्री.आर.आर. घोरपडे, कनिष्ठ लिपिक	जि.व स.न्या. अहमदनगर	जमीन खरेदी करुन घर बांधणी	२७९४०० (चार हप्ते)	६९८५०	१ला हप्ता (२५%)	नियमानुसार
९	श्री.आर.बी. शिंदे, कनिष्ठ लिपिक	जि.व स.न्या. अहमदनगर	नवीन घर बांधणी	२३५६०० (तीन हप्ते)	९४२४०	२रा हप्ता (४० %)	मूळ वेतनानुसार

१०	श्री.सी.व्ही. व्यवहारे, वरिष्ठ लिपिक	जि.व स.न्या. अहमदनगर	नवीन घर बांधणी	३६७५०० (तीन हप्ते)	११०२५०	३रा हप्ता (३०%)	नियमानुसार
				एकूण रुपये	**२१०९८२०**		
(एकूण रुपये एकवीस लाख नऊ हजार आठशे वीस फक्त)							

शासन पत्र क्रमांक : घबांअ-२०११(१०)/(प्र.क्र. ८/११)/पाच, दिनांक २८ मार्च,२०११

सोबतचे विवरणपत्र - यादी क्रमांक २

मागासवर्गीय (वर्ग ३ व त्यावरील) अधिकारी व कर्मचारी

अ.क्र.	अर्जदाराचे नाव व पदनाम	मंजुरी अधिकारी	प्रयोजन	एकूण प्रमाणित अग्रिम	या शासन पत्रान्वये प्रमाणित करण्यात आलेले अग्रीम	हप्ता/ एक रकमी	शेरा
१	श्री.जी.एस. सुखदेवे, सहायक अधीक्षक	जि.व स.न्या. गडचिरोली	नवीन घर बांधणी	४०८१५० (तीन हप्ते)	१६३२६०	२रा हप्ता (४०%)	नियमानुसार
२	श्रीमती व्ही.एन. आव्हाड, कनिष्ठ लिपिक	जि.व स.न्या. अहमदनगर	जुने तयार घर खरेदी	२८५०००	२८५०००	एक रकमी	मूळ वेतनानुसार
३	श्री.बी.बी. गर्जे, कनिष्ठ लिपिक	जि.व स.न्या. अहमदनगर	तयार घर खरेदी	२५१२५०	२५१२५०	एक रकमी	मूळ वेतनानुसार
४	श्री.एम.आर. तुलावी, वरिष्ठ लिपिक	जि.व स.न्या. गडचिरोली	नवीन घर बांधणी	४०८७५० (तीन हप्ते)	१२२६२५	३रा हप्ता (३० %)	नियमानुसार
५	श्री.ए.जे. गोंडे, वरिष्ठ लिपिक	जि.व स.न्या. यवतमाळ	नवीन घर बांधणी	३६०००० (तीन हप्ते)	१०८०००	३रा हप्ता (३०%)	नियमानुसार
६	श्री.एम.ए. भिसीकर, कनिष्ठ लिपिक	जि.व स.न्या. नागपूर	कर्ज परतफेड	३१६६१३	३१६६१३	एक रकमी	शिफारशीनुसार
७	श्री.डी.एन. बनसोडे, बेलिफ	जि.व स.न्या. अहमदनगर	नवीन घर बांधणी	२४५६५० (तीन हप्ते)	९८२६०	२रा हप्ता (४० %)	मूळ वेतनानुसार
				एकूण रुपये	**१३४५००८**		

(एकूण रुपये तेरा लाख पंचेचाळीस हजार आठ फक्त)

शासन पत्र क्रमांक : घबांअ-१०११(१०)/(प्र.क्र. ८/११)/पाच, दिनांक २८ मार्च,२०११

सोबतचे विवरणपत्र - यादी क्रमांक ३

सर्वसाधारण/अमागास (वर्ग ४ चे कर्मचारी)

अ.क्र.	अर्जदाराचे नाव व पदनाम	मंजुरी अधिकारी	प्रयोजन	एकूण प्रमाणित अग्रिम	या शासन पत्रान्वये प्रमाणित करण्यात आलेले अग्रीम	हप्ता/ एक रकमी	शेरा
१	श्री.एल.व्ही. ठाकूर, शिपाई	महानगर दंडाधिकारी, मुंबई	कर्ज परतफेड	३०००००	३०००००	एक रकमी	मूळ वेतनानुसार
२	श्रीमती पी.बी. बिरवाडकर, हमाल	प्रबंधक, नगर दिवाणी व सत्र न्यायालय,मुंबई	कर्ज परतफेड	२५२७५०	२५२७५०	एक रकमी	शिफारशीनुसार
३	श्री.के.एल. भरीतकर, शिपाई	जि.व स.न्या. अहमदनगर	जमीन खरेदी करुन घर बांधणी	२०८५०० (चार हप्ते)	५२१२५	१ला हप्ता (२५%)	नियमानुसार
				एकूण रुपये	**६०४८७५**		

(एकूण रुपये सहा लाख चार हजार आठशे पंच्याहत्तर फक्त)

<table>
<tr><td colspan="8">शासन पत्र क्रमांक : घबांअ-२०११(१०)/(प्र.क्र. ८/११)/पाच, दिनांक २८ मार्च,२०११
सोबतचे विवरणपत्र - यादी क्रमांक ४
मागासवर्गीय (वर्ग ४ चे कर्मचारी)</td></tr>
<tr><th>अ.क्र.</th><th>अर्जदाराचे नाव व पदनाम</th><th>मंजुरी अधिकारी</th><th>प्रयोजन</th><th>एकूण प्रमाणित अग्रिम</th><th>या शासन पत्रान्वये प्रमाणित करण्यात आलेले अग्रीम</th><th>हप्ता/ एक रकमी</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>१</td><td>श्री.डब्ल्यू.के. मेश्राम, नाईक</td><td>जि.व स.न्या. गडचिरोली</td><td>नवीन घर बांधणी</td><td>३००००० (तीन हप्ते)</td><td>९००००</td><td>३रा हप्ता (३० %)</td><td>नियमानुसार</td></tr>
<tr><td colspan="5">एकूण रुपये</td><td>९००००</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td colspan="8">(एकूण रुपये नव्वद हजार फक्त)</td></tr>
</table>

<table>
<tr><td colspan="3">शासन पत्र क्रमांक : घबांअ-२०११(१०)/(प्र.क्र. ८/११)/पाच,
दिनांक २८ मार्च,२०११</td></tr>
<tr><th>यादी क्रमांक</th><th>अर्जदारांची संख्या</th><th>रक्कम रुपये</th></tr>
<tr><td>१</td><td>१०</td><td>२१०९८२०</td></tr>
<tr><td>२</td><td>७</td><td>१३४५००८</td></tr>
<tr><td>३</td><td>३</td><td>६०४८७५</td></tr>
<tr><td>४</td><td>१</td><td>९००००</td></tr>
<tr><td>एकूण रुपये</td><td>२१</td><td>४१४९७०३</td></tr>
<tr><td colspan="3">(एकूण रुपये एक्केचाळीस लाख एकोणपन्नास हजार सातशे तीन फक्त)</td></tr>
</table>

(बा.कि.रासकर)
शासनाचे अवर सचिव